मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दि. 14 ऑगस्ट 2025 | पान- 1

# नागरिकांच्या कल्पनांनी घडणार पिंपरी चिंचवडचा विकास

## महापालिकेच्या अर्थसंकल्पात नागरी सहभाग, 15 ऑगस्टपासून देता येणार सूचना..!

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या अर्थसंकल्पात नागरिकांना त्यांचा सक्रिय सहभाग नोंदवता यावा, यासाठी महापालिका गेल्या काही वर्षांपासून उपक्रम राबवत आहे. या उपक्रमांतर्गत अर्थसंकल्प २०२५-२६ मध्ये पुनावळे येथील नव्या रस्त्यांसाठी, चऱ्होलीतील सुधारीत पादचारी मार्गांसाठी निधी देण्यापासून ते रावेतमधील नवीन पायाभूत सुविधा प्रकल्पांसाठी निधीची तरतूद करण्यात आली आहे. आता अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये देखील नागरिकांनी सुचवलेल्या योजनांसाठी त्यांच्या परिसरात वसूल होणाऱ्या मालमत्ता कराच्या १० टक्के निधीची तरतूद करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने नागरिकांना १५ ऑगस्ट २०२५ पासून त्यांच्या सूचना देता येणार आहेत.

आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या अर्थसंकल्पासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेला आठ प्रभागांतून २ हजार २७९ नागरिकांच्या सूचना प्राप्त झाल्या होत्या. छाननीनंतर त्यांपैकी ७८६ सूचना स्वीकारण्यात




आल्या आणि नागरिकांनी सुचवलेल्या तब्बल ४९९ कामांना निधी देण्यात आला. नागरिकांनी सुचवलेल्या कामांसाठी ९४.८६ कोटी रुपये राखीव निधी ठेवण्यात आला होता. मात्र महापालिकेने नागरिकांनी सुचवलेल्या सामाजिक कामांना प्राधान्य देताना या कामांसाठी १३८.९८ कोटी रुपयांचा निधी वाटप केला.

ड प्रभागाला सर्वात जास्त लाभ..

नागरिकांनी सुचवलेल्या योजनांसाठी त्यांच्या परिसरात वसूल होणाऱ्या मालमत्ता कराच्या १० टक्के निधीची तरतूद केली जाते. त्यानुसार सर्वात जास्त लाभ ड प्रभागाला झाला आहे. या प्रभागातील पुनावळे, ताथवडे, वाकड आणि पिंपळे सौदागर परिसरात नागरिकांनी सुचवलेली विविध कामे पूर्ण करण्यात आली आहेत. येथे मुख्य रस्त्यांची कामे, ड्रेनेजची कामे आणि उद्यानांसाठी ४३.८८ कोटी रुपयांचा निधी देण्यात आला. ब प्रभागातील रावेत, किवळे या भागातील कामांसाठी २०.६० कोटी रुपयांचा निधी मिळाला. या निधीत रस्त्यांच्या कामांपासून रावेतमधील नवीन महापालिका शाळेपर्यंतची कामे समाविष्ट आहेत. शहरातील जवळपास सर्वच प्रभागांतून आलेल्या नागरिकांच्या सूचनांमध्ये रस्त्यांची कामे, पादचारी मार्ग, उद्यान सुधारणा, कचरा व्यवस्थापन अशा प्रमुख कामांचा समावेश होता. तसेच सर्वच प्रभागांत सार्वजनिक सुरक्षेसाठी सीसीटीव्ही बसविणे, थेरगावमध्ये शहरी रस्ता डिझाईन मानकांनुसार पादचारी मार्ग बांधणे आणि पिंपरी गावात रेल्वे उड्डाणपूल विकसित करणे अशा कामांचाही समावेश होता.

नागरिकांच्या सूचनांचा विचार करून आणि कामांचा प्राधान्यक्रम ठरवून अर्थसंकल्प २०२५-२६ मध्ये निधीची तरतूद करण्यात आली आहे.

### अर्थसंकल्प 2026-27 असा नोंदवा अभिप्राय..

- » पिंपरी चिंचवडचा कोणताही रहिवासी अर्थसंकल्प २०२६-२७ मध्ये कोणते काम घ्यावे, याबाबत सूचना देऊ शकतो.
- » पिंपरी चिंचवड महापालिका संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज भरून नागरिकांना सूचना देता येतील.
- » नागरिकांना ऑफलाइन अर्ज भरण्याची सुविधा प्रत्येक प्रभाग कार्यालयात उपलब्ध करून देण्यात आली आहे.
- » नागरिकांनी सुचवलेल्या योजनांसाठी त्यांच्या परिसरात वसूल होणाऱ्या मालमत्ता कराच्या १० टक्के निधीची तरतूद करण्यात येणार आहे.
- » हा निधी रस्ते, पादचारी मार्ग, उद्याने, सार्वजनिक सुविधा, कचरा व्यवस्थापन, पाणीपुरवठा, पथदिवे, सुरक्षा उपाय अशा कामांसाठी वापरला जाईल.

“ अर्थसंकल्पात नागरिकांचा सहभाग घेतल्याने अर्थसंकल्प सर्वसमावेशक होत असून यामुळे शहरातील गरजांनुसार नागरी सुविधांचा विकास होण्यास मदत होत आहे. अर्थसंकल्प २०२५-२६ मध्ये नागरिकांनी सुचवलेल्या कामांसाठी निधीची तरतूद केली आहे. आगामी अर्थसंकल्प २०२६-२७ साठी पुन्हा एकदा नागरिकांना सहभाग नोंदवता येणार आहे.

**– शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका.**

आता नागरिकांकडून पुन्हा अर्थसंकल्प २०२६-२७ साठी सूचना मागवण्यात येणार असून त्याची सुरुवात १५ ऑगस्ट २०२५ पासून होणार आहे.

---

# प्रतिष्ठेच्या कॉन्स्टिट्यूशन क्लबच्या निवडणुकीत खासदार बारणे विजयी

## लोकसभा, राज्यसभेच्या आजी-माजी खासदारांसाठी कॉन्स्टिट्यूशन क्लब हा अधिकृत क्लब

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकसभा, राज्यसभा खासदारांच्या गरजा व अपेक्षा लक्षात घेऊन विविध उपक्रम राबविणाऱ्या दिल्लीतील प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या कॉन्सिटय़ूशन क्लबच्या निवडणुकीत मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे विजयी झाले. महाराष्ट्रातून बारणे हे एकमेव उमेदवार होते. ते विजयी झाले. सर्वपक्षीयांशी असलेल्या संबंधांचा बारणे यांना या राजकारण, पक्षविरहित असलेल्या निवडणुकीत फायदा झाला.

लोकसभा, राज्यसभेच्या आजी-माजी खासदारांसाठी कॉन्सिटय़ूशन क्लब हा अधिकृत क्लब आहे. लोकसभेचे अध्यक्ष त्याचे पदसिद्ध अध्यक्ष असतात. गेल्या अनेक वर्षांपासून या क्लबवर भाजपचे खासदार राजीवप्रताप रुडी यांचे वर्चस्व आहे. सर्व पक्षातील खासदारांशी उत्तम संपर्क असलेलाच उमेदवार या निवडणुकीत निवडून येतो.



कॉन्स्टिट्यूशन क्लबच्या 2025 निवडणुकीत कार्यकारी सदस्यांच्या निवडणुकीसाठी 12 ऑगस्ट रोजी मतदान प्रक्रिया पार पडली. सचिवपदासाठी राजीवप्रताप रुडी आणि संजीव बालियान यांच्यात लढत झाली. त्यात रुडी विजयी झाले. सदस्यपदाच्या 11 जागांसाठी 14 जणांनी अर्ज भरले होते.

महाराष्ट्रातून खासदार श्रीरंग बारणे यांचा एकमेव अर्ज दाखल होता. लोकसभा, राज्यसभेच्या 669 विद्यमान व माजी खासदारांनी मतदान केले. या मतदानासाठी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी, राज्यसभेचे विरोधी पक्षनेते, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकाअर्जुन खर्गे, शत्रुघ्न सिन्हा, स्मृती इराणी, कंगना रणौत यांच्यासह लोकसभेचे विद्यमान व माजी सदस्य, कॉन्स्टिट्यूशन क्लबचे सदस्य असलेले केंद्रीय मंत्री आणि खासदारांनी मोठ्या संख्येने मतदानात सहभाग घेतला. विशेष म्हणजे, यामध्ये महाराष्ट्राचे खासदार सर्वाधिक संख्येने उपस्थित होते. पक्षविरहित असलेल्या या निवडणुकीत खासदार श्रीरंग बारणे मोठ्या मताधिक्याने विजयी झाले.

# महापालिकेकडून अतिक्रमणांवर ‘बुलडोझर’

## राष्ट्रीय महामार्गालगतच्या दोन्ही बाजूंच्या 24 मीटरपर्यंतच्या सेवा रस्त्यांवरील 110 अतिक्रमणे हटवली

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ड आणि ब क्षेत्रीय कार्यालयांच्या वतीने मुंबई–बंगळुरू राष्ट्रीय महामार्गालगत असणाऱ्या सेवा रस्त्यांच्या रुंदीकरणासाठी अतिक्रमण निर्मूलन मोहिम राबवण्यात आली. ड क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने पवना नदी पुलापासून मुळा नदी पुलापर्यंत अंदाजे ७ किलोमीटर लांबीच्या मुख्य महामार्गालगतच्या दोन्ही बाजूंच्या २४ मीटरपर्यंतच्या सेवा रस्त्यांवरील अतिक्रमणे हटवण्यात आली. यासाठी ११० बांधकामांना नोटीस देऊन कारवाई करण्यात आली.




पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, शहर अभियंता मकरंद निकम यांच्या मार्गदर्शनाखाली महापालिका मुख्यालय अतिक्रमण विभागाचे सहाय्यक आयुक्त अतुल पाटील यांच्या अधिपत्याखाली ड क्षेत्रीय अधिकारी अमित पंडित, ब क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड यांच्या नेतृत्वात ही कारवाई करण्यात आली.

ड क्षेत्रीय कार्यालयांतर्गत क्षेत्रीय अधिकारी अमित पंडित यांच्या नेतृत्वात करण्यात आलेल्या कारवाई वेळी कार्यकारी अभियंता (शहरी दळणवळण), अनधिकृत बांधकाम विभागाचे उपअभियंता, बीट निरीक्षक, विद्युत विभागाचे उपअभियंता, नगररचना विभागाचे सर्वेयर, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे ७० जवान, तसेच वाकड व रावेत पोलिस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी यांच्या मदतीने ही कारवाई करण्यात आली. कारवाईसाठी ८ जेसीबी, २ क्रेन, ३० मजूर, ब्रेकर यांसारखी यंत्रसामग्री वापरण्यात आली.

तर ब क्षेत्रीय कार्यालयांतर्गत क्षेत्रीय अधिकारी अश्विनी गायकवाड यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या कारवाई दरम्यान बांधकाम परवानगी विभागाचे उपअभियंता, कनिष्ठ अभियंता, ५ बीट निरीक्षक, महाराष्ट्र सुरक्षा दलाचे ५५ जवान, २० पोलीस कर्मचारी व अधिकारी, महापालिकेचे ५ मजूर, १२ खासगी मजूर यांच्या मदतीने ही कारवाई करण्यात आली. यासाठी ६ जेसीबी मशीनचा वापर करण्यात आला.

### वाहतूक सुकर व सुरळीत होण्यास मदत..!

» पिंपरी चिंचवड महापालिकेच्या या मोहिमेमुळे मुंबई – बंगळुरू महामार्गालगतचे सेवा रस्ते अतिक्रमणमुक्त होऊन वाहतुकीसाठी सुरक्षित आणि सुकर झाले आहेत. यामुळे नागरिकांची गैरसोय दूर झाली आहे. तसेच या सेवा रस्त्यांवर कुठल्याही प्रकारचे अतिक्रमण केल्यास महापालिकेच्या वतीने कडक कारवाई करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

# भटक्या कुत्र्यांच्या बंदोबस्तासाठी आता “दिल्ली पॅटर्न”

## आमदार महेश लांडगे यांची मागणी; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन

**पिंपरी | प्रतिनिधी**

राज्यात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या भटक्या कुत्र्यांच्या समस्येकडे आता गंभीर दृष्टीकोनातून पाहण्याची वेळ आली आहे. पिंपरी-चिंचवडसह राज्यातील प्रमुख शहरांमध्ये भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने राजधानी नवी दिल्ली रिजनसाठी दिलेल्या निर्णयाच्या धर्तीवर भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.

याबाबत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र पाठवले आहे. तसेच, महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनाही सूचना केली आहे. त्यांनी दिलेल्या पत्रात म्हटले आहे की, भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने दि.11 ऑगस्ट 2025 रोजी एक महत्त्वपूर्ण आदेश पारित केला असून, त्यानुसार नवी दिल्ली व एनसीआर (नॅशनल कॅपिटल रिजन) क्षेत्रामध्ये वाढत्या भटक्या कुत्र्यांच्या समस्येमुळे निर्माण होणाऱ्या रॅबीज आणि कुत्र्यांच्या चावण्याच्या घटना अत्यंत गंभीर असल्याचे नमूद करून तात्काळ उपाययोजना करण्याचे आदेश दिले आहेत.



सर्वोच्च न्यायालयाचे प्रमुख निर्देश पुढीलप्रमाणे आहेत: 1. सर्व भटक्या कुत्र्यांचे तत्काळ रस्त्यावरून हटविण्यात यावे. 2. संबंधित प्राधिकरणांनी ८ आठवड्यांच्या आत आवश्यक ‘डॉग शेल्टर्स’ (निवारे) उभारावेत. 3. पकडलेल्या कुत्र्यांची नोंद व्यवस्थित ठेवावी आणि एकही कुत्रा पुन्हा रस्त्यावर सोडू नये. 4. कुत्र्यांच्या चाव्याच्या घटनांवर त्वरित प्रतिसाद देण्यासाठी हेल्पलाइन एक आठवड्यात सुरू करावी. 5. रॅबीज प्रतिबंधक लस उपलब्ध असलेल्या ठिकाणांची यादी प्रसिद्ध करावी. 6. भटक्या कुत्र्यांच्या बंदोबस्ताच्या कामात अडथळा आणणाऱ्यांवर (प्राणीप्रेमींचाही समावेश) न्यायालयीन अवमानाची कारवाई करण्यात येईल.

महाराष्ट्रातील प्रमुख महानगरे – मुंबई, नवी मुंबई, ठाणे, पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, सोलापूर, कोल्हापूर इत्यादी मोठ्या शहरांमध्ये भटक्या कुत्र्यांची संख्या झपाट्याने वाढत असून, अनेकदा लहान मुले, वृद्ध नागरिक व सामान्य नागरिक या कुत्र्यांच्या चावण्यामुळे जखमी होत आहेत, तसेच काही ठिकाणी रॅबीजसारख्या आजारामुळे दुर्दैवी मृत्यू घडले आहेत. याबाबत आम्ही विधानसभा अधिवेशनामध्ये सातत्याने राज्य सरकारचे लक्ष वेधले आहे.

दरम्यान, महानगरपालिका आयुक्त शेखर सिंह यांनाही पत्र दिले असून, सर्वोच्च न्यायालयाने ज्या प्रमाणे नवी दिल्लीमध्ये निर्णय घेतला. त्याच धर्तीवर पिंपरी-चिंचवडमध्ये उपायोजना करण्याबाबत कार्यवाही करावी आणि सर्वसामान्य नागरिकांना दिलासा द्यावा, असे आमदार लांडगे यांनी म्हटले आहे.

### ... या उपाययोजना तातडीने राबवण्याची मागणी

1. सर्व जिल्हा आणि महानगरपालिका क्षेत्रांमध्ये भटक्या कुत्र्यांची संख्या मोजण्यासाठी एक विशेष मोहीम राबवावी.
2. प्रत्येक शहरात आणि तालुकास्तरावर कुत्र्यांसाठी सुरक्षित निवारे (डॉग शेल्टर्स) उभारण्याचे आदेश द्यावेत.
3. स्थानिक स्वराज्य संस्थांना आवश्यक निधी उपलब्ध करून द्यावा.
4. सार्वजनिक ठिकाणी रॅबीज प्रतिबंधक लसीकरण मोहीम राबवावी.
5. कुत्र्यांच्या चाव्याच्या घटनांची तक्रार नोंदवण्यासाठी राज्यस्तरीय टोल-फ्री हेल्पलाइन सुरु करावी.
6. सर्व शाळा, अंगणवाड्या, उद्याने, गार्डन्स येथे विशेष निरीक्षण ठेवण्याचे आदेश द्यावेत.
7. या मोहिमेत सहभागी असलेल्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना कायदेशीर संरक्षण व प्रशिक्षण दिले जावे.
8. या अभियानात अडथळा आणणाऱ्यांविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले जावेत.
9. भटक्या कुत्र्यांची समस्या ही केवळ स्वच्छतेची किंवा अडचणीची बाब नसून, जनतेच्या आरोग्याशी थेट संबंधित गंभीर प्रश्न आहे. दिल्लीत सर्वोच्च न्यायालयाने घेतलेल्या दृष्टीकोनानुसार महाराष्ट्रातही तात्काळ समांतर कारवाई झाली पाहिजे.

# बेशिस्त वाहनचालकांवर 'एआय' कॅमेऱ्यांची नजर

## कॅमेरे बसविलेल्या वाहनातून फर्ग्युसन, जंगली महाराज रस्त्यावर गस्त

**पुणे | प्रतिनिधी**

बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करण्यासाठी वाहतूक पोलिसांनी कृत्रिम बुद्धीमत्ता तंत्रज्ञानावर आधारित (एआय) कॅमेरे बसविलेल्या वाहनांचा वापर करण्यास सुरवातकेली आहे. एआय कॅमेरे असलेले वाहन शहरातील जंगली महाराज रस्ता आणि फर्ग्युसन रस्त्यावर गस्त घालून बेशिस्त वाहनचालकांवर कारवाई करणार असून, वाहतूक नियमभंगाची दंडात्मक ऑनलाइन पावती (ई-चलन) वाहनचालकांना त्वरीत मोबाइल संदेशाद्वारे मिळणार आहे.




'प्रुफ ऑफ कन्सेप्ट' (पीओसी) या प्रायोगिक प्रकल्पाअंतर्गत एआय कॅमेरे बसविलेली पोलिसांचे वाहन शहरातील वेगवेगळ्या भागात गस्त घालणार आहे. या योजनेचा प्रारंभ मंगळवारी करण्यात आला. पोलीस आयुक्त अमितेशकुमार, सहआयुक्त रंजनकुमार शर्मा, अतिरिक्त आयुक्त मनोज पाटील, पोलीस उपायुक्त हिंमत जाधव, सहायक आयुक्त नंदानी वाग्याणी-पराजे या वेळी उपस्थित होते. 'एआय' कॅमेऱ्यांद्वारे बेशिस्त वाहनचालकांविरुद्ध फर्ग्युसन रस्त्यावर कारवाई करण्यास सुरुवात झाली आहे. गेल्या तीन महिन्यात फर्ग्युसन रस्त्यावर वाहतूक नियमभंग करणाऱ्या तीन हजार ९४९ वाहनचालकांवर कारावई करण्यात आली आहे.

प्रायोगिक तत्वावर एआय कॅमेरे बसविलेले एक वाहन जंगली महाराज रस्ता, फर्ग्युसन रस्त्यावर गस्त घालणार आहे. या वाहनांवरील कॅमेरे बेशिस्त वाहनचालकांना टिपून त्यांच्यावर कारवाई करणार आहेत. वाहतूक नियमभंग केल्यानंतर त्वरीत दंडात्मक कारवाईचा संदेश वाहनचालकांना मोबाइलवर मिळणार आहे.

### कॅमेरे असलेल्या वाहनांची संख्या वाढविणार

» प्रायोगिक तत्त्वावर सध्या जंगली महाराज आणि फर्ग्युसन रस्त्यावर एआय कॅमेरे बसविलेले वाहन गस्त घालणार आहे. त्यानंतर अशा प्रकारच्या वाहनांची संख्या वाढविण्यात येणार आहे. बेशिस्तांवर कारवाई, तसेच वाहतुकीला शिस्त लागण्यास मदत होणार आहे, असे अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील यांनी सांगितले. या कॅमेऱ्यांमुळे रस्त्यावरचे वादविवाद कमी होतील, तसेच कारवाईही प्रभावी होईल.

# वाहतूक कोंडीमुक्त येरवड्यासाठी ग्रेडसेपरेटर

## येरवडा परिसरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी महापालिकेने महत्त्वाकांक्षी पाऊल उचलले

**पुणे | प्रतिनिधी**

येरवडा परिसरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी बिंदू माधव ठाकरे चौकात उड्डाणपूलाबरोबरच ग्रेड सेपरटेर उभारण्यात येणार असून त्यासंदर्भातील निविदा प्रक्रिया महापालिक प्रसानसाकडून सुरू करण्यात आली आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांमध्ये प्रत्यक्ष कामाला प्रारंभ होण्याची शक्यता असून या परिसरातील वाहतूक कोंडी दूर होणार आहे. यासाठी एकशे पंधरा कोटींचा खर्च अपेक्षित आहे.

शहरातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी पुणे महापालिकेकडून विविध उपाययोजना राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये रस्ते रुंदीकरणासह महत्त्वाच्या चौकांवर फ्लायओव्हर आणि ग्रेड सेपरेटर उभारण्याचा समावेश आहे. त्याअंतर्गत येरवडा परिसरातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी बिंदू माधव ठाकरे चौकात फ्लायओव्हरबरोबर ग्रेड सेपरेटर उभारण्याचा निर्णय महापालिकेच्या प्रकल्प विभागाने घेतला आहे.

बिंदू माधव ठाकरे चौकातून संगमवाडी, खडकी, बंडगार्डन पूल तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर सोसायटी कडे जाता येते. या भागात सकाळी आणि संध्याकाळी मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी होत असते. संगमवाडी येथे खासगी बसस्थानक असल्याने येथून गाड्यांची येथे नियमित वाहतूक असते.

खडकीहून बंडगार्डनकडे जाणाऱ्या रस्त्यावर फ्लायओव्हर उभारला जाणार आहे. हा फ्लायओव्हर दोन मार्गिकांचा असणार आहे. उड्डाणपुलाच्या दोन्ही बाजूंना २-२ मार्गिका वाहतुकीसाठी उपलब्ध असतील. या उड्डाणपुलाची लांबी ९०० मीटर लांबी तर रुंदी १५.६० मीटर एवढी आहे, अशी माहिती महापालिकेच्या प्रकल्प विभागाकडून देण्यात आली.




संगमवाडी बाजूने डॉ. आंबेडकर चौक आणि बंडगार्डनकडे जाणारा वाय आकाराचा ग्रेड सेपरेटर प्रस्तावित आहे. संगमवाडीहून डॉ. आंबेडकर चौकाकडे जाणारा ग्रेडसेपरेटर ५५० मीटर लांबीचा तर बंडगार्डनकडे जाणारा भाग ४४० मीटर लांबीचा असेल. संगमवाडी बाजूचा ग्रेड सेपरेटर ९ मीटर रुंद व ३ मार्गिकांचा असणार आहे. तसेच डॉ. आंबेडकर चौक आणि बंडगार्डनकडे जाणारा भाग ७.५ मीटर रुंद प्रत्येकी दोन-दोन मार्गिकांचा असणार आहे.

### एकशे पंधरा कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित

» या फ्लायओव्हर व ग्रेड सेपरेटर प्रकल्पाची अंदाजित किंमत ११५ कोटी ७३ लाख रुपये आहे. हे काम पूर्ण करण्यासाठी ३० महिने म्हणजेच सुमारे अडीच वर्षांचा कालावधी ठेवण्यात आला आहे.

# वाढत्या प्रदूषणासह पावसाळी हवेमुळे नवीन धोका!

## पुण्यात फुफ्फुसातील बुरशी संसर्गाची दोन प्रकरणे; काळजी घेण्याचा सल्ला

**पुणे | प्रतिनिधी**

पल्मनरी अस्परजिलोसिस म्हणजेच फुफ्फुसातील बुरशी संसर्ग हा श्वसनविकाराच्या रुग्णांमध्ये आढळून येत असे. आता सर्वसाधारण व्यक्तींमध्येही हा संसर्ग वाढला आहे. वाढत्या प्रदूषणासह पावसाळ्यातील ओलसर हवेमुळे यात वाढ झाल्याचे निरीक्षण आरोग्यतज्ज्ञांनी नोंदविले आहे. या पार्श्वभूमीवर काळजी घेण्याचा सल्लाही देण्यात आला आहे.



पुण्यात नुकतीच अशी दोन प्रकरणे समोर आली आहेत. श्वसनविकार नसलेल्या रुग्णांमध्ये फुफ्फुसातील बुरशी संसर्ग आढळून आला आहे. यातील पहिला रुग्ण ४६ वर्षीय पुरुष आहे. त्याला सतत कोरडा खोकला येत होता. याचबरोबर अधूनमधून तापही येत होता. त्याचे वजन कमी झाले होते. त्याच्या छातीच्या स्कॅनमध्ये डाव्या फुफ्फुसाच्या खालच्या भागात न्यूमोनियाचे निदान झाले. त्यामुळे डॉक्टरांनी सुरुवातीला क्षयरोग किंवा कर्करोग असण्याची शक्यता व्यक्त केली. मात्र, ब्रॉन्कोस्कोपी व ब्रॉन्कोॲल्व्हिओलर लावेज (बीएएल ) तपासणीत ॲस्परजिलस फ्लॅव्हस ही कमी ज्ञात बुरशी प्रजाती आढळली. सध्या रुग्ण पूर्णपणे बरा झाला आहे.

दुसऱ्या घटनेत, ५६ वर्षीय महिलेला छातीच्या उजव्या वरच्या भागात गाठीसारखा वाढलेला भाग आणि फुफ्फुसामध्ये निर्माण होणारी पोकळी आढळून आली. मात्र, बीएएल तपासणीत ॲस्परजिलस नायजर ही बुरशी आढळली. तिच्यावर यशस्वी उपचार करण्यात आले असून तिच्या फुफ्फुसातील जखम हळूहळू बरी झाली. फुफ्फुसातील बुरशी संसर्ग हा प्रामुख्याने श्वसनविकाराच्या रुग्णांमध्ये तीव्र स्वरूपाची ॲलर्जीच्या प्रतिक्रियेमुळे होतो. तसेच, रोगप्रतिकारशक्ती कमी असलेल्या रुग्णांमध्येही या संसर्गाचा धोका असतो. मात्र या दोन्ही प्रकरणांमध्ये वाढते प्रदूषण आणि पावसाळ्यातील ओलसर हवा कारणीभूत ठरल्याचे निरीक्षण या रुग्णांवर उपचार करणाऱ्या डॉक्टरांनी नोंदविले आहे.

### रोगप्रतिकारशक्ती चांगली असलेल्या व्यक्तींनाही धोका

» याबाबत बाणेरमधील मणिपाल हॉस्पिटलमधील श्वसनविकार विभागाचे प्रमुख डॉ. नागेश धाडगे म्हणाले, पल्मनरी ॲस्परजिलोसिस आता फक्त रोगप्रतिकारशक्ती कमी असलेल्या रुग्णांपुरता मर्यादित राहिलेला नाही. हवामानातील बदल, वायुप्रदूषण आणि पावसाळ्यातील जास्त आर्द्रता हे घटकही आता बुरशीजन्य संसर्ग होण्यामागे कारणीभूत ठरत आहेत. त्यामुळे रोगप्रतिकारशक्ती उत्तम असलेल्या व्यक्तींना देखील हा आजार होऊ शकतो. वरील दोन्ही प्रकरणांमध्ये ब्रॉन्कोस्कोपी व बुरशी प्रतिबंधक औषधोपचारामुळे वेळेवर उपचार करणे शक्य झाले आणि धोका टाळता आला. क्षयरोग किंवा कर्करोग नसल्याची खात्री घेतल्यानंतरच आम्ही योग्य निदान करू शकलो. बुरशीचा प्रकार ओळखण्यासाठी ब्रॉन्कोस्कोपी आणि ब्रॉन्कोॲल्व्हिओलर लावेज या तपासण्या उपयुक्त ठरल्या आणि याचमुळे योग्य उपचार करता आले.

> पावसाळ्यात श्वसनाच्या तक्रारींबद्दल नागरिकांना दक्ष राहणे आवश्यक आहे. खोकला येणे, ताप आणि वजन कमी होणे यांसारख्या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नये. हवेतील जास्त आर्द्रतेमुळे बुरशी वेगाने वाढते. त्यामुळे हा संसर्ग होण्याची शक्यताही वाढते.
>
> – डॉ. नागेश धाडगे, श्वसनविकारतज्ज्ञ

# इंदापूर पोलिसांचा 'बुलेटराजां'ना दणका

## वाहतुकीचे नियम न पाळणाऱ्यांवर आणखी कठोरातील कठोर कारवाई करण्याचा इशारा

**पुणे | प्रतिनिधी**

इंदापूर पोलिसांनी बुलेटराजांना मोठा दणका दिला. कर्णकर्कश आवाज करणाऱ्या तब्बल 35 बुलेट दुचाकींवर मंगळवारी (दि. 12) पोलिसांनी कारवाई केली.

या बुलेट दुचाकींच्या सायलेन्सरवर पोलिसांनी बुलडोझर चालवला आहे. या कारवाईतून इंदापूर पोलिसांनी तब्बल 35 हजार रुपयांचा दंडदेखील वसूल केला आहे. वाहतुकीचे नियम न पाळणाऱ्यांवर आणखी कठोरातील कठोर कारवाई करण्याचा इशारा बारामतीचे उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड यांनी दिला आहे.

या वेळी राठोड म्हणाले, इंदापूर शहर व परिसरात अलीकडील तरुणाई बुलेटगाड्यांचा मोठमोठ्याने आवाज करून सायलेन्सरमध्ये फटाका फोडतात. यातून वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन होते तसेच परिसरातील नागरिकांनाही याचा त्रास वाढत आहे. त्यामुळे अशा बुलेटचालकांवर कारवाई केली आहे. त्यात 35 बुलेटचे सायलेन्सर बुलडोझरच्या साह्याने नष्ट केले आहेत.

1 जुलै ते 12 ऑगस्ट या कालावधीमध्ये रस्त्यावर नो-पार्किंगमध्ये वाहने उभ्या 156 दुचाकी तसेच ट्रिपल सीट प्रवास करणाऱ्या 11 जणांवर, काळ्या काचा असलेल्या 55 कारचालकांवर आणि नंबरप्लेट नसलेल्या 40 जणांसह सायलेन्सरमध्ये बदल करणाऱ्या 65 जणांवर कारवाई केली आहे.



यापुढेही वाहतुकीचे नियम पाळून पोलिस प्रशासनाला सहकार्य करावे; अन्यथा कारवाई करणार असल्याचेही राठोड यांनी स्पष्ट केले.या वेळी इंदापूरचे पोलिस निरीक्षक सूर्यकांत कोकणे, पोलिस अधिकारी, कर्मचारी, वाहतूक पोलिस, पोलिस पाटीलउपस्थित होते.